केंद्र शासनाच्या "Laser Interferometer Gravitational Wave Observatory Project" (LIGO-India Project) या प्रकल्पासाठी मौ.दुधाळा,ता.औंढा नागनाथ, जि.हिंगोली येथील गट नं.४१२ व गट नं. ४२५ मधील एकूण ४०.६८ हे. आर. शासकीय जमीन मंजूर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
**शासन परिपत्रक क्रमांकः जमीन-२०१६/प्र.क्र.२०७/ज-७**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १८ ऑक्टोबर, २०१६.

<u>वाचा:</u> शासन निर्णय क्रमांकः जमीन-२०१६/प्र.क्र.२०७/ज-७,दि.१७.१०.२०१६.

परिपत्रक

केंद्र शासनाच्या "Laser Interferometer Gravitational Wave Observatory Project" (LIGO-India Project) या प्रकल्पासाठी मौ.दुधाळा,ता.औंढा नागनाथ, जि.हिंगोली येथील गट नं.४१२ व गट नं. ४२५ मधील एकूण ४०.६८ हे.आर. शासकीय जमीन मंजूर करणेबाबतचा शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. जमीन-२०१६/प्र.क्र.२०७/ज-७,दि.१७.१०.२०१६ अन्वये निर्गमित करण्यात आला आहे.

सदरचा शासन निर्णय या परिपत्रकासोबत सोबत जोडला असून तो महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१६१०१८१७४८५९१२१९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Kiran Pandurang Wadte

Digitally signed by Kiran Pandurang Wadte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Kiran Pandurang Wadte
Date: 2016.10.21 18:20:44 +05'30'

(कि.पां.वडते)
उपसचिव,महाराष्ट्र शासन

प्रत:

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५. मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.

६. मा. महालेखापाल,(लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य,(१) मुंबई -३२.

७. मा. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य,(२) नागपूर

८. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई -३२.

९. अप्पर मुख्य सचिव (वित्त विभाग) मंत्रालय, मुंबई -३२.

१०. अपर मुख्य सचिव (मदत व पुर्नवसन) महसूल व वन विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई

११. प्रधान सचिव (महसूल) यांचे विकाअ/स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई-३२.

११. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२

१२. जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१३. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.

१४. जिल्हाधिकारी,हिंगोली.

१५. निवडनस्ती(ज-७).

केंद्र शासनाच्या "Laser Interferometer Gravitational Wave Observatory Project" (LIGO-India Project) या प्रकल्पासाठी मौ.दुधाळा,ता.औंढा नागनाथ, जि.हिंगोली येथील गट नं.४१२ व गट नं. ४२५ मधील एकूण ४०.६८ हे. आर. शासकीय जमीन मंजूर करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक: जमीन-२०१६/प्र.क्र.२०७/ज-७
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १७ ऑक्टोबर, २०१६.

**वाचा**: १. अध्यक्ष , परमाणु उर्जा आयोग यांचे पत्र क्रमांक २३४-२०१६ दि.२३.०८.२०१६
२.जिल्हाधिकारी,हिंगोली यांचे पत्र जा. क्र.२०१६-जमीन-१-कावी,दि.२८.०९.२०१६.

**प्रस्तावना:-**

अध्यक्ष, अणू ऊर्जा आयोग तथा सचिव, अणू ऊर्जा विभाग, भारत सरकार यांनी "Laser Interferometer Gravitational Wave Observatory Project" (LIGO-India Project) या जागतिक महत्वाच्या संशोधनात्मक प्रकल्पासाठी हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ तालुक्यातील सुमारे १७३.२५ हेक्टर आर जमीन सवलतीच्या दराने प्रदान करण्याची राज्य शासनाकडे दि.२३.०८.२०१६ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली आहे. सदर जमिनीमध्ये शासकीय जमिनीसोबतच खाजगी व वन जमिनीचाही समावेश आहे.

सदर प्रकल्प 'Laser Interferometer Gravitational Wave Observatory' (LIGO-USA) यांच्या संयुक्त विद्यमाने साकारण्यात येणारा 'Gravitational Waves' संबंधी असणारी कोडी उलगडण्यास मदत करणारा जगातील अत्यंत महत्वाचा संशोधनात्मक प्रकल्प आहे. "LIGO-India" प्रकल्पामुळे वैज्ञानिक व अभियंते यांच्यासाठी 'Gravitational Waves' च्या संदर्भात संशोधनाच्या संधी उपलब्ध होतील. तसेच भारतीय विद्यार्थी व वैज्ञानिक यांच्यासाठी ज्ञानाच्या कक्षा रूंदावण्यास या प्रकल्पाचा हातभार लागेल. असा प्रकल्प महाराष्ट्र राज्यात असणे ही महाराष्ट्राच्या दृष्टीने गौरवाची बाब ठरणार आहे याचा विचार करता 'Laser Interferometer Gravitational Wave Observatory Project' (LIGO-India Project) साठी केंद्र सरकारने केलेल्या विनंतीनुसार मौ.दुधाळा,ता.औंढा नागनाथ,जि.हिंगोली येथील ग.नं.४१२ मधील २४.२२ हे. आर व गट नं. ४२५ मधील १६.४६ हे.आर. अशी एकूण ४०.६८ हे. आर शासकीय जमीन केंद्र शासनाच्या अणु उर्जा विभागास प्रदान करण्यास राज्य मंत्रिमंडळाने दि.०४.१०.२०१६ रोजी औरंगाबाद येथे झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत तत्वत: मान्यता प्रदान केली आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या सदर निर्णयानुसार 'LIGO-India' प्रकल्पासाठी उक्त एकूण ४०.६८ हे. आर शासकीय जमीन केंद्र शासनाच्या अणु उर्जा विभागास तत्वत: प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती,त्यानुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे :-

**शासन निर्णय :-**

केंद्र सरकारच्या "Laser Interferometer Gravitational Wave Observatory Project (LIGO-India Project) साठी मौ.दुधाळा,ता.औंढा नागनाथ,जि.हिंगोली येथील ग.नं.४१२ मधील २४.२२ हे. आर व गट नं. ४२५ मधील १६.४६ हे.आर. अशी एकूण ४०.६८ हे. आर शासकीय जमीन महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ च्या कलम ४० मधील तरतूदींनुसार खालील अटी व शर्तींवर प्रचलित आदेशानुसार भोगवटामूल्य

आकारून कब्जेहक्काने भोगावटादार वर्ग-२ या धारणाधिकारावर केंद्र शासनाच्या अणु ऊर्जा विभागास प्रदान करण्यास शासनाची तत्वत: मान्यता देण्यात येत असून सदर प्रकल्पासाठी आवश्यक जमीनीचे निश्चित क्षेत्र व हद्द संयुक्त मोजणीअंती निश्चित होणार असल्यामुळे या प्रकल्पासाठी प्रत्यक्षात आवश्यक शासकीय जमिनीच्या क्षेत्रामध्ये बदल होण्याची शक्यता विचारात घेता सदर प्रकल्पाच्या क्षेत्राची संयुक्त मोजणी झाल्यानंतर प्रत्यक्षात आवश्यक शासकीय जमिनीचा ताबा शासनाच्या प्रचलित धोरणानुसार भोगवटा मूल्य आकारुन भारत सरकारच्या अणू ऊर्जा विभागास प्रदान करण्यास जिल्हाधिकारी, हिंगोली यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**अटी व शर्ती:-**

(I) जिल्हाधिकारी ,हिंगोली यांनी सदर जागा वाटपास निर्बाध्यरित्या उपलब्ध असल्याचे खातरजमा करणे आवश्यक राहील.

(II) केंद्र शासनाच्या अणु ऊर्जा विभागास विषयांकित शासकीय जमीन वर्ग केल्यानंतर उक्त विभाग सदर जमीन भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकाराने धारण करील आणि शासनाच्या पुर्वपरवानगीशिवाय सदर जमीन किंवा तिचा कोणताही भाग किंवा तिच्यातील कोणतेही हितसंबंध विक्री / देणगी देऊन/अदला बदल करून/गहाण ठेऊन / पट्ट्याने देऊन / खाजगी-सार्वजनिक सहभाग तत्वावर किंवा बाह्य यंत्रणेद्वारे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत करणार नाही. सदर जमीनीवर अथवा त्याच्या कोणत्याही भागावर अन्य व्यक्ती / संस्था / कंपनी इत्यादींचे कोणत्याही प्रकारचे हक्क निर्माण होतील अशा प्रकारे कोणताही आर्थिक व्यवहार करता येणार नाही. तसेच शासनाच्या महसूल विभागाच्या पूर्वमान्यतेशिवाय सदर जमीनीचे पोट विभाजन करता येणार नाही.

(III) केंद्र शासनाच्या अणु ऊर्जा विभाग विषयांकित शासकीय जमीनीचा वापर केवळ मंजूर प्रयोजनासाठी करील. अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी सदर जमीनीचा अथवा त्याच्या कोणत्याही भागाचा तात्पुरता अथवा कायमस्वरुपी वापर करावयाचा झाल्यास त्यासाठी शासनाच्या महसूल व वन विभागाची पूर्वमान्यता आवश्यक राहील.

(IV) जमीनीचा ताबा मिळाल्यापासुन ३ वर्षाच्या आत मंजूर प्रयोजनासाठी वापर सुरु करणे बंधनकारक राहील .

(V) विषयांकीत जमीनीवर संबधित सक्षम प्राधिकारी / नियोजन प्राधिकरणाच्या विहित परवानगीने व मंजुर विकास नियंत्रण नियमावलीनुसार विकास होणे बंधनकारक राहील. तसेच या व्यतिरिक्त अन्य संबधीत विभाग /शासकीय यंत्रणा यांची मान्यता /पुर्व परवानगी /नाहरकत घेणे देखील बंधनकारक राहील.

(VI) शासकीय जमीन मंजूरी संदर्भातील इतर नियमीत अटी या ठिकाणी लागू राहतील.

(VII) प्रस्तावित प्रयोजनाच्या व सुरक्षेच्या अनुषंगाने राज्य व केंद्र शासनाच्या विविध विभागांनी वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश /सूचना या प्रकरणी बंधनकारक राहतील व त्या अनुषंगाने आवश्यक खबरदारी /काळजी घेणे बंधनकारक राहील.

(VIII) प्रस्तवित प्रयोजनामुळे लगतच्या खातेदारांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, त्यांच्या वैध वहिवाटेस बाधा येणार नाही तसेच सदर जागेस पोच रस्ता उपलब्ध करण्याची कार्यवाही अणु ऊर्जा विभाग यांनी करणे आवश्यक राहील .

(IX) वरील अटी/ शर्ती पैकी कोणत्याही अटी /शर्तीचा भंग केल्यास शर्त भंगाबाबत सदर शासकीय जमीन शासन जमा करण्याचा अधिकार शासनास राहील.

(X) जिल्हाधिकारी , हिंगोली यांना आवश्यक वाटतील अशा अन्य अटी व शर्ती विहित करण्याची मुभा राहील.

सदर शासन निर्णय वित्त विभागाशी विचारविनिमय करून तसेच त्यांच अनौपचारीक संदर्भ क्र. २८२/२०१६/व्यय-९,दि.०१.१०.२०१६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(कि.पां.वडते)
उपसचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५. मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६ मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई -३२.
७. अप्पर मुख्य सचिव (वित्त विभाग) मंत्रालय, मुंबई -३२
८. प्रधान सचिव (महसूल) यांचे विकाअ/स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई-३२.
९. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,मंत्रालय,मुंबई-३२
१०.विभागीय आयुक्त, औरंगाबाद.
११. जमाबंदी आयुक्त व संचालक ,भुमी अभिलेख,महाराष्ट्र राज्य ,पुणे.
१२. मा. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य,(२ ) नागपूर.
१३. वित्त विभाग ( व्यय-९),मंत्रालय, मुंबई -३२.
१४. जिल्हाधिकारी,हिंगोली.
१५. निवडनस्ती(ज-७).